॥ सा विद्या या विमुक्तये ॥

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

'ज्ञानतीर्थ', विष्णुपुरी, नांदेड – ४३१ ६०६ (महाराष्ट्र राज्य) भारत

SWAMI RAMANAND TEERTH MARATHWADA UNIVERSITY, NANDED

'Dnyanteerth', Vishnupuri, Nanded - 431 606 (Maharashtra State) INDIA

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड Established on 17th September, 1994, Recognized By the UGC U/s 2(f) and 12(B), NAAC Re-accredited with'B++' grade

Fax : (02462) 215572 **NATIONAL SERVICE SCHEME DEPARTMENT** website: srtmun.ac.in

Phone: (02462) 215246 E-mail: nss@srtmun.ac.in

जा.क्र. : रासेयो/२०२४–२५/११२ दिनांक ०२/०८/२०२४

## परिपत्रक

प्रति,
मा. प्राचार्य/रा.से.यो. कार्यक्रम अधिकारी,
नांदेड शहरातील रा.से.यो. राबविणारी सर्व संलग्नीत महाविद्यालये,
प्रस्तुत विद्यापीठ.

**विषय: अवयवदान जनजागृती रॅलीमध्ये विद्यार्थ्यांना सहभागी होण्यास कळविणे बाबत.**

**संदर्भ:** डॉ. शंकरराव चव्हाण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय नांदेड यांचे जा.क्र. डॉ.शंचशावैमनां/ लले/४१०/२०२४ दिनांक ०१/०८/२०२४

महोदय,

उपरोक्त विषयी मा. अधिष्ठाता, डॉ. शंकरराव चव्हाण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय नांदेड यांनी जनतेमध्ये अवयव दानाबद्दल जनजागृती करण्यासाठी दिनांक ०३ ऑगस्ट २०२४ रोजी अवयवदान जनजागृती रॅली सकाळी ठिक ८:०० वाजता महात्मा फुले पुतळा, आय.टी.आय. कॉर्नर पासून शहरातील विविध मार्गावरून परत मा. जिल्हाधिकारी कार्यालय, नांदेड येथे समाप्त होणार आहे. व नांदेड शहरातील सर्व महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना सदर रॅलीमध्ये सहभागी होण्याबाबत कळविलेले आहे.

तरी त्या अनुषंगाने नांदेड शहरातील रा.से.यो. संलग्नीत सर्व महाविद्यालयांना कळविण्यात येते की, डॉ. शंकरराव चव्हाण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय नांदेड यांनी दिनांक ०३ ऑगस्ट २०२४ रोजी आयोजित केलेल्या अवयवदान जनजागृती रॅली मध्ये सकाळी ठिक ८:०० वाजता आप आपल्या महाविद्यालयाचा गणवेश परिधान करून रा.से.यो. बॅनर व बॅजेस सह महात्मा फुले पुतळा, आय.टी.आय. कॉर्नर येथून निघणा–या रॅली मध्ये जास्तीत जास्त विद्यार्थ्यांना सहभागी होण्यास कळविण्यात यावे तसेच रॅलीत सहभागी होणा–या विद्यार्थ्यांसोबत महाविद्यालयातील प्राध्यापक/रा.से.यो. कार्यक्रम अधिकारी यांना पण सहभागी होण्यास कळविण्यात यावे, ही विनंती.

डॉ. मल्लिकार्जुन करजगी
संचालक
राष्ट्रीय सेवा योजना विभाग

**प्रत माहितीस्तव:**

१) मा. कुलगुरू महोदयांचे कार्यालय, प्रस्तुत विद्यापीठ.
२) मा. कुलसचिवांचे कार्यालय, प्रस्तुत विद्यापीठ.
३) मा.जनसंपर्क अधिकारी, जनसंपर्क कार्यालय, प्रस्तुत विद्यापीठ.

**प्रत माहिती तथा कार्यवाहिस्तव:**

१) सिस्टीम एक्सपर्ट, संगणक कक्ष, प्रस्तुत विद्यापीठ, यांना प्रत देवून कळविण्यात येते की, सदरील परिपत्रक विद्यापीठाच्या व रा.से.यो विभागाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करावे, ही विनंती.

महाराष्ट्र शासन
# डॉ.शंकरराव चव्हाण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, नांदेड
Dr.ShankarraoChavanGovt.Medical College, Vishnupuri, Nanded
Phone No. ०२४६२ २२९२७७ (A.O.) Dean ०२४६२ २२९२७४ Email:gmcnanded@gmail.com /gmcnanded@rediffmail.com

जा.क्र. डॉ.शंचशावैमनां/लले/410/२०२४ दिनांक :- ०१.०८.२०२४

प्रति,

मा. संचालक तथा कार्यक्रम अधिकारी,
राष्ट्रीय सेवा योजना
स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ
विष्णुपूरी,नांदेड

**विषय**:- अवयवदान जनजागृती अभियानांतर्गत रॅलीसाठी नांदेड शहरातील सर्व महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या सहभागाबाबत.

**संदर्भ**:- १. केंद्र शासनाच्या आरोग्य व कुटुंब कल्याण विभागाचे पत्र क्र D.O.No. D-२२/६०४/IEC/NOTTO/२३ दि.२४-०६-२०२४.

२. संचालनालयाचे पत्र क्र DMEER १५०३/२०२३-O/O COMMISSIONER/११०९१ दि.०४-०७-२०२४.

महोदय,

उपरोक्त संदर्भिय विषयान्वये सविनय विनंती आहे की, डॉ. शंकरराव चव्हाण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, विष्णुपुरी, नांदेड यांच्या वतीने दिनांक ३ ऑगस्ट २०२४ रोजी अवयव दान जनजागृती अभियान अंतर्गत रॅलीचे आयोजन करण्यात आलेले आहे. सदर रॅली महात्मा फुले पुतळा आय.टी.आय. कॉर्नर, नांदेड पासून सकाळी८ वाजता सुरू होऊन शहरातील विविध मार्गावरून परत ते मा. जिल्हाधिकारी, कार्यालय, नांदेड येथे समाप्त होईल.

या रॅलीचे उद्दिष्ट जनतेमध्ये अवयव दानाबद्दल जनजागृती करणे आहे, जेणेकरून अधिकाधिक लोक या महान कार्यात सहभागी होऊन गरजू रुग्णांना जीवनदान देऊ शकतील.

सदर रॅलीमध्ये आपल्या अधिपत्याखालील नांदेड शहरातील सर्व महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, यासाठी सर्व प्राचार्य यांना आवश्यक ते निर्देश देण्याची कृपा करावी, ही नम्र विनंती आहे.

आपल्या सहकार्याबद्दल आम्ही आभारी आहोत.

धन्यवाद.

[डॉ.एस.बी.देशमुख]
अधिष्ठाता,
डॉ. शंकरराव चव्हाण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय,
विष्णुपुरी, नांदेड

Smt. Shailey
Prepare a circular
01/08/24